वि.प्रभाग-१ सेक्शन I
विषय - मराठी वाङ्मय

अर्थशास्त्रीय मराठी कविता

अनुक्रमणिका

■ प्रस्तावना

सत्र – १

१. केशवसुत
   (अ) तुतारी
   (ब) नवा शिपाई
   (क) आम्ही कोण?
२. बा. सी. मर्ढेकर
   (अ) भंगुं दे काठिन्य माझें
   (ब) गणपत वाणी
   (क) ह्या गंगेमधि
३. बा. भ. बोरकर
   (अ) जीवन त्यांना कळलें हो
   (ब) मज लोभस हा इहलोक हवा
   (क) जिणे गंगौघाचे पाणी
४. कुसुमाग्रज
   (अ) अहि-नकूल
   (ब) हिमलाट
   (क) आगगाडी व जमीन
५. इंदिरा संत
   (अ) मृण्मयी
   (ब) हाकेवरी आहे गाव
   (क) झंझावात .
६. विंदा करंदीकर
   (अ) माझ्या मना बन दगड
   (ब) ती जनता अमर आहे!
   (क) सब् घोडे बारा टक्के
७. नारायण सुर्वे
   (अ) चार शब्द
   (ब) [illegible]

१.
केशवसुत

■

परिचय : केशवसुत (१८६६-१९०५)

केशवसुत उपाख्य कृष्णाजी केशव दामले हे आधुनिक मराठी कवितेचे जन म्हणून परिचित आहेत. इंग्रजी स्फूट कविता वाचून त्यांना काव्यस्फूर्ती झाली अ म्हटले जात असले तरी स्वतःच्या व्यक्तित्त्वाचा व भावविचारांचा आविष्कार त्यां स्वयंस्फूर्तपणे केला आहे. 'हरपले श्रेय' या कवितासंग्रहामध्ये केशवसुतांच कवितांचा समावेश आहे. 'प्रेमभावना', 'निसर्गप्रेम', 'गूढगुंजन', 'सामान्य गोष्टीत सौंदर्य शोधण्याची वृत्ती', 'सामाजिक क्रांतीचे आवाहन' त्यांच्या कवितेतून जाणव आशय आणि अभिव्यक्ती या दोन्ही दृष्टींनी केशवसुत यांनी मराठी कवितेत आमूल परिवर्तन घडवून आणले. मराठीमध्ये नवी वृत्ते, सुनीत यासारखे नवीन काव्यप्र त्यांनी मराठीत आणले. 'मयुरासन', 'ताजमहाल' या कविता म्हणजे मराठीत पहिल्या वहिल्या सुनीत रचना होय.

काव्यरचनेच्या माध्यमातून निसर्गाविषयीचा नाविन्यपूर्ण दृष्टिकोण, सामाजि रुढींविरुद्ध बंडखोरी व स्वातंत्र्य, न्याय, समता, बंधुता इ. मूल्यांचा पुरस्क केशवसुतांनी केला आहे. 'काव्ये नवी' आणि 'बा काहीतरी गा नवीन' असे उल्ल त्यांनी स्वतः करून ठेवले आहेत. आत्मनिष्ठा, संवेदनशीलता आणि समाजाभिमु ही केशवसुतांच्या लेखनाची वैशिष्ट्ये असून त्यांच्या बहुतांश कविता विशे 'स्फूर्ति', 'तुतारी', 'नवा शिपाई' इ. आवेशपूर्ण व बंडखोर वृत्तीच्या निदर्शक आ

मराठी कवितेत विकसित झालेल्या बहुतांश काव्यप्रवृत्तींचा उगम केशवसुत कवितेत आढळून येतो.

(ब) नवा शिपाई

नव्या मनूतिल नव्या दमाचा शूरशिपाई आहे,
कोण मला वठणीला आणू शकतो ते मी पाहे!
ब्राह्मण नाही, हिंदुहि नाही; न मी एक पंथाचा,
तोच पतित की जे आखडिती प्रदेश साकल्याचा!
खादाड असे माझी भूक,
चतकोराने मला न सूख;
कूपातिल मी नच मंडूक;
मळ्यात माझ्या कुंपण पडणे अगदी न मला साहे!
कोण मला वठणीला आणू शकतो ते मी पाहे!

जिकडे जावे तिकडे माझी भावंडे आहेत,
सर्वत्र खुणा माझ्या घरच्या मजला दिसताहेत;
कोठेही जा- पायांखाली तृणावृता भू दिसते,
कोठेही जा - डोईवरते दिसते नीलांबर ते!
सावलीत गोजिरी मुले
उन्हात दिसती गोड फुले,
बघता मन हर्षून डुले;
ती माझी- मी त्यांचा, एकच ओघ अम्हांतुनि वाहे!
कोण मला वठणीला आणू शकतो ते मी पाहे!

पूजितसे मी कवणाला? तर पूजितसे अपणाला
अपुल्यामध्ये विश्व पाहुनी, पूजी मी विश्वाला;
"मी" हा शब्दच मजला नलगे. संपुष्टी हे लोक
आणुनि तो निजशिरी ओढिती अनर्थ भलते देख!
लहान-मोठे मज न कळे
साधु-अधम हे द्वयहि गळे,
दूर-जवळ हा भाव पुले.

४.

कुसुमाग्रज

■

परिचय : कुसुमाग्रज (१९१२-१९९९)

कुसुमाग्रज उपाख्य विष्णू वामन शिरवाडकर हे महाराष्ट्रातील श्रेष्ठ नाटकक तेजस्वी कवी आणि मानवतावादी लेखक म्हणून परिचित आहेत. त्यांचे 'जीवनलह 'किनारा', 'मराठी माती', 'हिमरेषा', 'वादळवेल' इ. कवितासंग्रह प्रकाशित अ 'दूरचे दिवे', 'दुसरा पेशवा', 'वैजयंती', 'कौंतेय', 'राजमुकूट', 'नटसम्राट' इत्य स्वतंत्र व अनुवादित नाटके प्रकाशित आहेत. 'वैष्णव', 'जान्हवी', 'कल्पने तीरावर' इ. कादंबऱ्या व 'फुलवाली', 'आहे आणि नाही', 'सतारीचे बोल', 'रूपर हे कथा-लघुनिबंध संग्रह आदी वाङ्मय प्रसिद्ध आहे. मडगाव (गोवा) येथे १९ साली भरलेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद कुसुमाग्रज य भूषविले आहे. कुसुमाग्रजांना ज्ञानपीठ पुरस्कारासह असंख्य पुरस्कारांनी सन्मा करण्यात आले.

ओजस्वी भाषा, प्रखर आवेश, राष्ट्रीय आकांक्षांशी समरसता, विषमतेची च मानवतेचे प्रेम, उत्तुंग कल्पना या गुणांनी नटलेली त्यांची कविता ही प्रकाशपू मानली जाते. उत्कृष्ट वर्णन, वेचक-यथार्थ शब्द आणि रेखीव रचना या बाब कुसुमाग्रज अग्रेसर मानले जातात.

सामाजिक जीवनातील अश्रू, असंतोष, चीड, त्वेष इत्यादी बाबी कुसुमाग्रजा कवितेत आढळतात. या सर्वांचे फक्त चित्रण करून ते थांबत नाहीत तर त्याव प्रेरक असा संदेशही देतात.

(ब) हिमलाट

हिमलाट पहाटे पहा जगावर आली!
मुखि पिळून मद्यास्तव द्राक्षांचे घोस
पाडीत मळे मोत्यांचे चरणी ओस
उद्दाम धावते करित दुर्भंग घरेस
करकरा पाखरे रगडी दाताखाली
हिमलाट पहाटे पहा जगावर आली!

श्रीमंत महाली तिथे हिला ना थारा
मखमाली दुलया देती मधुर उबारा
डोकावुन पळते कापत हीच थरारा
हो काय दरारा कनकाचा भयशाली
हिमलाट पहाटे पहा जगावर आली!

पाहून परंतू कुठे कुडाची खोपी
कंगाल कांबळी टाकुन गेले झोपी
शेकडो कवाडे! वाट जावया सोपी
कडकडून पडते तेथे लाव भुकेली
हिमलाट पहाटे पहा जगावर आली!


ज्योतींतून धावत या तेज:कण सारे
या यज्ञांतिल अन् सरणांतील निखारे
रे ढाळ नभा, तव ते ज्वालामय तारे
पेटवु द्या वणवा कणाकणांत मशाली
हिमलाट पहाटे पहा जगावर आली!

Coordinator
Commerce College

वि. ए. भाग - १, सेम II

विषय - मराठी (अ)

तहा



बैलांचे दोन सापळे दावणीला उभे असावेत तसे मुरल्या छबिल्या दिसत
लिंबाचा कडू पाला तोंडाने चावळून पुन्हा खाली सोडत होते .... कसं खावं
बिच्याऱ्यायले. ते त्याह्याचं खाणंच नाई. त्याह्याचं खाणं हाये जवारीचा कडब
गवत .... भुईमुगाचं, नाई त तुरीचं कुटार .... जवारीची भाकर खाणाऱ्या; अन् ग
पोळी खाणाऱ्या माणसाले समजा गवताची भाकर अन् मातीची पोळी करून दे
खाईल का त्यो ? आजेबात नाई. मारामारी करंल तळवाभर भाकरीसाठी. नाई
करंल .... पण इथं कोणाले सांगणार हायेत आपले बैलं ? बबन्या तिकडी ढा
जाऊन कोंबडं खात आसंल. पण इकडी बैलायचा काई घोर नाई .... टॅक्टरनं
करू म्हन्ते .... जसा काई हा लयेच तालेवाराच्या पोटचा हाये. काय हा
बिच्याऱ्यानं .... हाळाकळा लागंल त्याले .... मुरल्या छबिल्या अंगावरच्या
शेपटीने उडवून लावत होते. ते बैलांचे हाल पाहून त्याच्या डोळ्यात ओल दाटून
डोळ्यापुढे त्याच्या चार महिन्यापूर्वीचे बैल आले. लठ्ठ लठ्ठ. गबदुल अंगाचे. लदल
असणारे. आंगाले जरा बोट लावलं तरी सन करायचे नाईत. चामडी कशी थ
उठायची त्याह्याच्या आंगाची. काय मासोळीवाणी चंचलता व्हती यायच्या आंग
आता त आसे झाले, की जसे काई लाकडाचेच हायेत. लोटून देले त बतकन
पडतीन.

तेवढ्यात बबन शेवाळेने कुठून तरी कडब्याचा भारा आणला. कडबा
गव्हाणीत मोडून टाकला. उल्हासित झालेले बैल कडबा चावायला लागले.
दारातून पाहणाऱ्या राघोजीला एकदम बरं वाटलं. पोरास जवळ घेऊन त्याच्या
हात फिरवावा; असं वाटू लागलं. आणि दाताच्या फटीत अडकून बसलेला
तुकडा तो दाताने टोकरू लागला.

सकाळची उन्हं चांगलीच वर आली होती. राघोजी शेवाळेची मळकट गार्द
लागून उभी टाकलेली होती. दाराच्या थोड्या अंतरावर होती. पण दारातून बाहे
त्याला दिसायचं. डोक्याशी दोन उशा घेऊन तो रात्रंदिवस त्या मळकट गाव
रहायचा. दिवसभर ऊन रखरखत रहायचं. वाऱ्यावरची धूळ घरात उडत
गादीवर, अंगावरच्या घामावर, कपड्यावर बसायची. आणि अधून मधून त्य
रहायची. तो अंग खाजवायचा. तर आणखीच खाज सुटायची .... तशातच
लागायची. अन् अशी जाग यायची. केव्हा झोपलो. अन् केव्हा उठलो; त्या
कळायचं नाही. झोपेचं अन् जागेपणाचं अंतरच संपून गेलं होतं.

पण झोपेची जी ग्लानी यायची. त्या ग्लानीत त्याच्या डोळ्यापुढे काहीब

बी.ए भाग - १ सेम II

विषय - गांधी दर्शन

अर्थशास्त्र मराठी आवृत्ती

अनुक्रमणिका

सत्र–२

८. सुरेश भट
(अ) उषःकाल होता होता
(ब) एवढे दे पांडुरंगा!
(क) साय

९. दि. पु. चित्रे
(अ) शतके
(ब) देवा, ह्याही देशात पाऊस पाड
(क) हरवले जेथे ज्ञानदेव तुकाराम

१०. यशवंत मनोहर
(अ) मी येतो तेव्हा
(ब) तडफड
(क) मोडलो मी नाही

११. ना. धों. महानोर
(अ) ह्या नभाने ह्या भुईला
(ब) मीच माझा एककल्ली
(क) मोडलेल्या माणसांचे दुःख ओले झेलताना

१२. विठ्ठल वाघ
(अ) मेंढरं
(ब) साहेबराव पाटील
(क) मानूस

१३. प्रभू राजगडकर
(अ) मल्टी–ॲटिट्युड टॉवर्डस् आदिवासी
(ब) गोंगलू
(क) निकाल

१४. कल्पना दुधाळ
(अ) चूल
(ब) बाय आणि गाय

१२.
विठ्ठल वाघ

■

*परिचय : **विठ्ठल वाघ** (जन्म : १९४५)*

विठ्ठल भिकाजी वाघ हे वऱ्हाडी कवी म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांचे 'कप चंद्रफुले', 'काया मातीत मातीत', 'गावशीव', 'पंढरीच्या वाटेवर', 'पाऊसप 'साय', 'वृषभ सूक्त' इत्यादी कवितासंग्रह व 'डेबू' ही गाडगे बाबांच्या जी आधारित कादंबरी प्रकाशित आहे. त्यांच्या 'काया मातीत मातीत' या सं प्रियदर्शिनी पारितोषिक तसेच 'पाऊसपाणी' या संग्रहाला केशवसुत पुरस्कार मि आहे. त्यांनी अनेक चित्रपटांसाठी पटकथा व गीतलेखन केले आहे. या कार्यासं त्यांना अनेक पुरस्कार मिळालेले आहेत.

औंध साहित्य संमेलन, महात्मा फुले प्रबोधन मराठी साहित्य संमेलन, क साहित्य संमेलन, बोली साहित्य संमेलन, विदर्भ साहित्य संमेलन, कृषी साहित्य अशा अनेक साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले आहे.

कवी विठ्ठल वाघ यांनी अमरावती, अकोला, बुलडाणा, जळग औरंगाबाद या पाच जिल्ह्यातून पायी हिंडून काव्ययात्रेतून समाजप्रबोधन केले अमेरिका, कॅनडा या देशांमध्ये विठ्ठल वाघ यांच्या काव्यगायनाचे कार्यक्रम झाले आहेत. यावरून त्यांनी मराठी कविता साता समुद्रापार पोहचवली हे लक्षा

महाराष्ट्र शासनाच्या साहित्य आणि संस्कृती मंडळाने बोलीभाषेतील श संग्रह वाढविण्यासाठी पुढाकार घेतल्यानंतर प्रत्येक विद्यापीठाच्या आसप जिल्ह्यातील बोलीभाषेतील शब्दांचा संग्रह करण्याचे काम सुरू केले. त विद्यापीठाने डॉ. विठ्ठल वाघ यांची नेमणूक केली होती. वाघ यांनी ३३ तालु दौरा करून काही म्हणी व शब्द संकलित करून समर्थपणे ही जबाबदारी पार

(ब) साहेबराव पाटील

असं काहून होत असीन साहेबराव? असं काहून होत असीन?
काहून माहे हात मलेच वाघाच्या पंजावानी दिसत असतीन?
तुह्या रगतात न्हाल्यावानी माह्याच आंगावर येत असतीन?
खरं म्हनजे साहेबराव तुया आत्महत्या केलीच नाही.
आमीच तुहा खून केला... तुहा अन् तुह्या बायकोपोराईचाही.
तू गेल्याची बातमी आली त्यावक्ती मी बियरवर ताव मारत होतो
आळल्या हातानं बिर्यानी झोळत होतो.
असाच, तू कापसाच्या भावासाठी वारकऱ्याच्या भक्तीभावानं
दिंडीत चालला होता.
त्यावक्ती मी "महात्मा फुले" चौकात
पानठेल्यावर चारमिनारचे झुरके घेत होतो
हवेत धूर सोळत होतो
मनातल्या मनात तुही किव करत होतो.
शिकतासवरता तुह्यापासून इतका दूर होत गेलो साहेबराव
जसा मी तुह्या गावचाच नोतो.
तसा तू अन् मी खरं म्हंजे एका गावाचा
एका मातीचा, एकाच दांडापेंडाचा.
तुही इटी माहा दांडू, माहा दांडू तुहा चेंडू...
पुढे पुढे दिवस असे पालटत गेले
अन् आपुन दोघं झालो दोन चाकोल्यातले चाकं
एकमेकाले कधीच भेटू न शकनारे
मी अस्मान...तू जमीन.
तुहा लेका जलमताच जमीनीवर जसा जीवच जळला होता
चौथीतई तू सारे विषय सोळून निबंध लेहेस-
"भारत हा कृषिप्रधान देश आहे."
कृषि- तुहा जीनगानीची एकमेव खुशी

रोज रोज थोळंथोळं मरत असतात.
आपलं उपाशी पोट पाठीच्या नेटं उभं करत
ढेरपोट्याईले पोसत असतात.
आपुन मातर थोळंथोळं रोज रोज मरत असतात.
तुहं सरन पेटल्यावर मसनात एक म्हातारा सांगत होता म्हंतात-
"आता कापूसजवारी पेरसान त लेकहो हराममौतीनं मरसान
आता पेरा तासातासानं लोखंडी दगळी गोटे
चारी मेरीनं बाभुईचे खम्मन काटे...
त्या रोजी साहेबराव
मीही येनार होतो रे तुया मातीवर
पन ऑफिसात आल्या नव्या साहेबाचं रिसेप्शन होतं ते त्या
मी ताहा काय करत होतो हे माहा मलेही कयेत होतं.
पन म्हनूनच साहेबराव
तू मले माफ करु नको- कधीच माफ करु नको
साहेबराव!...

१४.
कल्पना दुधाळ

■

कल्पना दुधाळ (जन्म : १९७८)

कल्पना जालिंदर दुधाळ ह्या ग्रामीण जीवनाचे विदारक चित्रण मांडणाऱ्या पिढीतील महत्त्वाच्या कवयित्री म्हणून परिचित आहेत. त्यांचे 'सिझर कर म माती' व 'धग असतेच आसपास' हे दोन काव्यसंग्रह प्रकाशित आहेत. प काव्यसंग्रहास यशवंतराव चव्हाण साहित्य पुरस्कार, विशाखा साहित्य पुरस्कार ग. रोहमारे ग्रामीण साहित्य पुरस्कार यासह तब्बल अठरा पुरस्कार प्राप्त झाले त्यांच्या दुसऱ्या काव्यसंग्रहासही कै. संजीवनी खोजे पुरस्कार, लोककवी विठ्ठ पुरस्कार, यशवंतराव दाते पुरस्कार, बळीवंत पुरस्कार, जिव्हाळा साहित्य प इत्यादी पुरस्कार प्राप्त झाले आहेत.

साहित्य अकादमी दिल्लीच्या जोधपूर, भोपाळ, दिल्ली येथील कार्यक्रमांमध्ये निमंत्रित कवयित्री म्हणून त्यांनी सहभाग नोंदविला आहे. अकादमीच्या अखिल भारतीय लेखिका संमेलनात मराठी भाषेतील सन्मानित क म्हणून त्यांचा गौरव करण्यात आला आहे. भारत भवन, भोपाळ येथे बहु संमेलनात तसेच तेथील महाराष्ट्र महोत्सवात त्यांनी सक्रीय सहभाग नोंदवल महाराष्ट्र वनवाहिनीचा २०१६ चा 'सावित्री सन्मान' प्राप्त कल्पना दुधाळ अकरा कवितांचा समावेश अरुणा ढेरे संपादित 'स्त्री लिखित मराठी कवि कवितासंग्रहात कवयित्रीच्या भूमिकेसह करण्यात आला आहे.

गृहिणी, एकत्र कुटुंब पद्धती हे लेखनाचे पाठबळ मानणाऱ्या शेतीव्यवसायाशी संबंधित असल्याने शेतीत राबून आलेले अनुभव त्यांच्या शब्दबद्ध झाले आहेत. कृषिसंस्कृतीच्या व्यथा, शेतकरी जीवनाची दर्दभरी अ

(ब) बाय आणि गाय

शेवटलेल्या विळ्यानं
मी दुसऱ्याच्या बांधाचं भाराभार गवत कापलं
तेव्हा मालकानं विळा हिसकावून
नेलं सगळं गवत उचलून
माझ्या गायीच्या दावणीला काडीसुद्धा न ठेवता

मी गाय गवतात नेऊन बांधली
तर रान तुडवतंय म्हणत
हाकलून लावलं सगळ्यांनी

मग या गायीलाच घेतलं
माझ्यात ओढून
व्यवस्थेविरुद्ध विद्रोह करू म्हणून

पण तिनं मला दावं तोडून पळूच दिलं नाही
खुंटीभोवती फिरून फिरून खड्डेच खड्डे पडले
रवथांबरोबर दातही विरघळून गेले

मी पाहिली वाट कुणी येईल म्हणून
पण ही तर बिनपाण्याची विहीर
कुणी साधं डोकावलं नाही
हिसका देण्याएवढं बळही राहिलं नाही
तोंडाला फेस आला तेव्हा ती म्हणाली
"बाई ग तू काय नि मी काय
जन्मभर दावणीला बांधलेलो
शरीरातून शरीर बाहेर पडलं
आणि [illegible] की


अशोक पाट
आई रिटायर होतेय

आई : असं? मला वाटतं सेवा करणाऱ्यांनी सेवानिवृत्त व्हायचं असतं. त्या अर्थाने मी सेवानिवृत्त होणार आहे. कारण गेली चाळीस-पन्नास वर्षं मी सेवाच केलीय.

पपा : कुणाची?

आई : तुमची. तुमच्या मुलांची. त्यापूर्वी आईवडिलांची, भावंडांची, वडील गेल्यावर मामा-मामीची. प्रत्येक वेळी लेबल मात्र वेगळं होतं.

मंदार : तू आमची आई आहेस.

आई : तुमच्या बाबतीत आई हे माझं लेबल आहे. तुमच्या बायकांकरता मला सासूचं लेबल चिकटलेलं आहे. पपांकरता मी बायको ह्या नावानं सेवा केली. आईवडिलांनी एकुलती एक मुलगी म्हणून सेवा करून घेतली. आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर एक वेगळं लेबल मला समाजाने चिकटवलं आणि माझ्याकडून, एका स्त्रीकडून रात्रंदिवस फक्त सेवा करून घेतली.


पपा : तू आमची सेवा केलीस? मूर्ख आहेस! कर्तव्य म्हणतात त्याला.

आई : कर्तव्य हे सेवेचं दुसरं नाव आहे. म्हणूनच त्याची फक्त दुसऱ्याकडून अपेक्षा केली जाते.

पपा : पण जगातली प्रत्येक स्त्री हे कर्तव्य पार पाडीत असते.

आई : चूक! कर्तव्याच्या नावाखाली फक्त सेवा करत असते. हजारो वर्षांपासून कर्तव्याची ही भूल देऊन पुरुषप्रधान समाजाने स्त्रीला राबवून घेतलेलं आहे. स्वत:च्या सुखासाठी, स्वत:च्या स्वार्थासाठी. शेणगोठा तिनेच सांभाळायचा. जमीन तिनेच पुसायची. भांडी तिनेच घासायची. हाताला चटके बसत असताना भाकऱ्या तिनेच बडवायच्या. जेवल्यानंतर पुरुष ढेकरा देत उठले की उष्टीखरकटी तिनेच काढायची. जगातलं असं कोणतं हलक्या प्रतीचं काम आहे की जे पुरुषांनी स्त्रीवर ढकललेलं नाही? आणि ही सगळी कामं तिने कळायला लागल्यापासून ते मरेपर्यंत अव्याहतपणे करत रहायची. तुम्ही मात्र पंचावन्न-साठाव्या वर्षी रिटायर होऊन निवृत्तीनंतरचा आराम उपभोगायचा. विड्या फुंकत गावभर भटकायचं, रात्रभर मित्रांबरोबर गप्पा मारायच्या, पत्ते कुटायचे. पुरुषांच्या एका विशाल समाजाने स्त्रीवर केलेला हा घोर अन्याय आहे. हे बघा! मी ह्या क्षणी स्वत:कडे एक स्त्री म्हणून बघतेय. तुमचंही लक्ष मी माझ्याकडे म्हणजे एका स्त्रीकडे वेधतेय. विसरा की मी तुमची आई आहे, की सासू आहे, की बायको आहे, आणि सेवा करून करून पार कायापालट झालेल्या पन्नास वर्षांपूर्वीच्या एका सात-आठ वर्षांच्या मुलीकडे बघा, ही भातुकली खेळता खेळता मोलकरीण कधी झाली तिला कळलंच नाही. लग्नापूर्वी आणि लग्नानंतरसुद्धा मी स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध माझ्या शक्तीनुसार लढले. आजही मी तेच करतेय. आज

BA IInd Sem IIIrd (MLT)



BA II nd Sem III rd

अनुक्रमणिका

- प्रस्तावना

१. माझ्या बापाची पेंड – द.मा. मिरासदार ३

२. देशी उपाय – शंकर पाटील ४

३. रामा मैलकुली – व्यंकटेश माडगूळकर ५

४. माय – उद्धव शेळके ६

५. मजल्याचं घर – वामन होवाळ ७

६. किडलेली माणसं – गंगाधर गाडगीळ ८

७. ट्रॉयचा घोडा – जयंत नारळीकर ९

८. माणसाची गोष्ट – कमल देसाई ९

९. संस्कार – वामन कृष्ण चोरघडे १०

१०. हुंदका – राजन गवस ११

- कथाकारांचा परिचय १३

BA II nd Sem III rd

५.

मजल्याचं घर

■

वामन होवाळ

एस. टी. गाडीत काहीतरी बिघाड झाला होता एवढं खरं. जिवावर आ
एस. टी. घाट चढून वर आली होती. तिथून खरं म्हणजे सगळा उताराचा
पण एस. टी. अगदी हळूहळू चालली होती. दुसऱ्याच्या आधारानं एख
माणूस चालतो का नाही, तशी गाडी दवाखान्याच्या माळाला आली
बैलागत बैठक मारून बसली. मुक्कामाचं गाव आता तसं काही फारसं
असेल एक मैल-दीड मैल. पण ड्रायव्हर वैतागला होता. कंडक्टर नाइलाज
झाला होता. गाडी चालत नाही असं दिसताच एक-दोघे जण बोलले, "
हातानं त्येच्याआयला!"

कंडक्टरने सगळ्या गडी माणसांना खाली उतरायला सांगितलं. सगळ
जोर करून एस. टी. ढकलली. जराशी गती मिळताच गाडी सुरू झा
एकमेकाला हुंदे देऊन वर चढली. कंडक्टरनं घंटी मारताच गाडी आस्ते च
शाळा बुडविणाऱ्या पोराला ओढून नेताना ते जसं पाय रोवित का होईना
येतंच, तशा तऱ्हेने एस. टी. गावात शिरली. वेशीतल्या मुरगळ्यातू
अंड्याला आलेल्या कोंबडीसारखी एस. टी. करकली आणि ठ्याऽदि
पाटलाच्या वाड्यासमोर उभी राहिली. थांबतानाही एस. टी.नं एक शेव
दिलाच, त्या गलक्यानं

सगळी माणसं खाली उतरली.

एस. टी.च्या टपावर एका भल्यामोठ्या लाकडी पेटीला हात घालत हमा ओरडला, "आवं, ही पेटी कुणाची हाय?"

अंगावरचा धुरळा झटकीत बयाजी म्हणाला, "आवं, ती माजी हाय! सो खाली."

हमालानं दात-ओठ खात ती बोजड पेटी टपावरून खाली सोडली आ बयाजीनं ती अलगद झेलली.

त्या पेटीतून बयाजीनं आपला सगळा संसारच मुंबईहून आणला होता. आ मुंबईत राहायचं त्याला कारण काय होतं? गेली पस्तीस वर्षे तो गोदीमधे इमानेइतब काम करीत होता. दोन महिन्यांपूर्वीच तो आपल्या नोकरीतून सेवानिवृत्त झाला होत तसा काही तो कुठल्या मोठ्या हुद्याच्या जागेवर होता असं काहीच नव्हतं. ना म्हणायला गेली दोन वर्षं त्याला वाढवून मिळाली होती. तेवढ्या अवधीत तो मुकाट झाला होता. एरवी बाकीची सगळी वर्षं गोण्या उचलण्यातच त्यानं घालवली. र म्हणू नये, दिवस म्हणू नये. मिळेल तेव्हा त्याने भरपूर काम केलं होतं.

बयाजीचं वय साठ वर्षांच्या पुढं गेलं होतं, तरीही त्याची प्रकृती मात्र उत्त राहिली होती. बयाजी मूळचाच हाडा-पेरानं मजबूत. त्यात कष्टाचं काम करून त्या शरीर घोटीव झालं होतं. बयाजीनं हमालाला नवे पंधरा पैसे दिले नि डोक्यावर त पेटीचा बोजा घेऊन तो घराकडे चालू लागला. पेटीमधून त्यानं भांडीकुंडी आणि इ बरचसं सामान आणलं होतं.

कदमाच्या घराजवळ आल्यावर समोरून भुजाबा येत असलेला त्याला दिसल हा भुजाबा गावातला एक इरसाल ठग होता. डोक्यावरचा बोजा मानेच्या काट्य पेलून धरून बयाजी म्हणाला, "नमस्कार पाटील! कसं काय, बरं हाय का?"

बयाजी जातीनं महार होता. रीतिरिवाजानुसार त्यानं 'जोहार मायबाप' अ म्हणायला पाहिजे होतं. बयाजीच्या तोंडचे 'नमस्कार पाटील' हे शब्द ऐकून भुजा एकदम तडकला- "का? नमस्कार पाटील म्हणल्यावर, लय बामनाच्या कुळी उपजल्यागत वाटलं का? बुद्ध झाला म्हणून काय पायरी सोडता का लेकांनो?"

काय उत्तर द्यावं तेच बयाजीला कळेनासं झालं. डोक्यावरची पेटी तशी भुजाबाच्या टाळक्यात घालावी, असं क्षणभर त्याला वाटलं. पण असं करून क चालेल? आता तर पांढरीच्या पाटीच्या थराला तो बसणार होता, नाहीतर याच मात

BA IInd Sem IIIrd

९.

संस्कार

■

वामन कृष्ण चोरघडे

तिच्या तेरा वर्षांच्या कोवळ्या अंतःकरणात जी ज्योती त्या वेळी ह
असेल किंवा नाही मला माहीत नाही; पण अनुमानाने काही गोष्टी सिद्ध
असतील तर अजूनही ती ज्योती मालवायला तिने काहीएक कारण घड
असे वाटते.

आणि त्या वेळी तर तिचे अंतःकरण मृदू असूनही गुलाबकलिके
अंतरीचा प्रकाश तिच्या मुखावर खेळत होता, की मुखाची दीप्ती हृद
होती कुणास ठाऊक. पण सलमाचा एक मात्र अढळ विश्वास होता, मुख
तर मन नक्की प्रसन्न असते.

माझ्याच शाळेत असूनही तिचा सहवास मला फार उशिरा घडल
अनवर पाटलांची ती मुलगी. अनवर अब्बांचे दुकान आम्हांला आमचे
आणि अनवर पाटलांनीही आमचा दुजाभाव कधी केला नव्हता. एकद
मोहरमच्या सणात माझ्या अंगाला रंग लावून मला वाघ बनवून नाचाव
होते. त्या रूपड्यात मी माझ्या घरी अंगणात येऊन नाचू लागलो, त
बोलेस्तोवर मला कुणी कुणी ओळखले नाही. आईचा आपले मू
काढण्याचा अभिमान त्या दिवशी बराच जिरला.

अनवर पाटलांचे घर मात्र आम्हांला वर्ज्य होते. मुसलमानांच्या
जायचे नसते, अशा [illegible]

आत्मस्तुतीचा क्षण जसा माणसाला सुख देतो तसेच आत्मनिंदेतही कधीकधी ब
वाटते.


प्राथमरी मराठी शाळेत मी जात असे. शाळा म्हणजे एक मोठ्या उंच पडलेल्य
केलेल्याच्या खिंडारातील एक खोली व त्या समोरच पडवी आणि बाहेर खूप विस्तीर्
मैदान आणि आवार. त्यात दूधमोगऱ्याची पांढरी स्वच्छ फुले फुललेली. पहाटे तोडल
तर त्यांचा मादक मंद गंध मनाला भुरळ घालून जाई. शाळेच्या खोलीत दोन व
असत. खोली लांब होती. एका कोपऱ्यात मराठी चौथी आणि दुसऱ्या टोकाला उर्
बाहेरच्या पडवीत मराठी दुसरी आणि दुसऱ्या कडेला उर्दू दुसरी. मी मराठी दुसरी
होतो. सलमा उर्दूत होती आणि त्याच वर्षी येऊ लागली होती.

खेड्यातील मुलगी. अनवर अब्बांचा पानमळा होता. मोकळ्या हवेत सलमा
दिवस जात. घरी खाणेपिणे व्यवस्थित. त्यामुळे अंगाने आम्हा खेड्यातील मुलांसारख
ती पण थोराड दिसे. आजच्या संस्कृतीच्या तुलनेने सांगायचे म्हणजे ती चांगली १
वर्षांची दिसे. उंचपुरे गात. शरीरावर यौवनाच्या खुणा उमटत असलेल्या. रेशमी नि
पायजमा आणि वर फुलांचा सदरा व फडकी पांघरून ती शाळेत येई. रूप तिचे नित
होते. डोळ्यांत संकोच नव्हता. गहरी नजर पण निष्पाप होती. बोलताना नाकाती
लांब मोती हालत असे आणि त्याचे इवलेसे किरण तिचे ओठ आपल्याकडे ओ
घेत. चेहऱ्यावर देवीचे व्रण होते. चारदोन पेरूला वाघळे कधीकधी चोचीने टोचत
आणि त्याचे सौंदर्य वाढवितात. कोवळ्या पालवीनं भरलेल्या वृक्षावर चांदणे नाच
तसे मंदमंद स्मित! झाडावर जसे सोनचाफ्याचे फूल तशी ती मुलांत बसलेली असे.
शाळेत मुलंमुली एकत्र शिकत. खेड्यात असेच असते. शिक्षक म्हातारे, पितृतुल्
मुलांमुलींनाही कसलाच तिथे संकोच, भीती वाटत नाही. सलमा त्या कोपऱ्यात ब
मुनीर मास्तरांजवळ आलिफ् बे, पे, से, म्हणत बसे. आम्ही इकडे आम
मास्तरांच्या अध्यक्षतेखाली 'रामाने आपला पोपटाचा पिंजरा पुढल्या दारी टां
होता.' अशी पोपटपंची करीत असू.

सलमाकडे वारंवार लक्ष जाईल, धड्यात, खेळात किंवा खोड्यांत त्या
व्यत्यय येईल अशी मनःस्थिती त्या वेळी मुळीच नव्हती. सबब तिचा तिकडे अभ
चाले. आमचा इकडे अभ्यास चाले. मधली सुट्टी झाली की उन्हात आम्ही गो
खेळत असू. सलमा पडवीच्या खांबाशी टेकून आमचा खेळ पाहत असे.
खेळण्याचा उत्साह मला त्या वेळी सतत हवा असे. एकदा गोट्या खेळताना
तिकडे पाहिले. सलमालाही

BA IInd Sem IIIrd (MLT)

संत तुकारामांचे निवडक अभंग



Principal

BA II Sem III

आईवडील

१ मायबापे केवळ काशी । तेणें न वजावे तीर्थासी ।।१।।
पुंडलीकें काय केले ? । परब्रह्म उभे ठेले ।।२।।
तैसा होई सावधान । हृदयीं धरी नारायण ।।३।।
तुका म्हणे मायबापे । अवघी देवाची स्वरूपे ।।४।।

(अ.क्र. २९०

संत तुकारामांच्या मनात आईवडिलांविषयी अपार कृतज्ञता होती. सर्वांनी आईवडिलांविषयी उत्कट भावना बाळगावी, असा संस्कार समाजावर करण्या त्यांची इच्छा होती. आपल्याकडे परंपरेप्रमाणे काशी हे तीर्थक्षेत्र अतिशय प मानले जाते. तेथील तीर्थयात्रा लोकांना पुण्यदायक वाटते. परंतु याबाब तुकारामांचे उमदे मन एका वेगळ्या पद्धतीने विचार करताना दिसते. आईवड हेच विशुद्ध असे तीर्थक्षेत्र होय, अशी त्यांची धारणा होती. त्यामुळे, जो आईवडिल सेवा करण्यात मग्न असतो, त्याने काशीला वा अन्य तीर्थक्षेत्राला जाऊ तिकडे जाण्यासाठी आईवडिलांची सेवा थांबवू नये, असे ते ठामपणे सांगतात पटवून देण्यासाठी ते पुंडलीक या निष्ठावंत ईश्वरभक्ताचे उदाहरण देतात. पुंडलीक आईवडिलांची सेवा करण्याच्या बाबतीत सदैव दक्ष होता. तो विठ्ठल भक्त होता, म्हणून त्याने विठ्ठलाला भक्तिभावाने बोलावून घेतले, परंतु विठ्ठलाचे स्वागत, सत्कार वा पूजा करण्यासाठी आईवडिलांची सेवा थांबवी नाही. उलट, त्याने परब्रह्माला म्हणजेच विठ्ठलाला, ईश्वराला विटेवर उभे आणि आईवडिलांच्या सेवेतच विठ्ठलाची भक्ती मानली. तुकाराम पुंडलिकाच आदर्श आपल्या नजरेपुढे ठेवत आहेत. लोकांनी याबाबतीत सावध रहावे, तीर्थक्षे वा ईश्वराला आईवडिलांपेक्षा श्रेष्ठ मानू नये, ईश्वराला आपल्या हृदयात करून त्याला आईवडिलांच्या ठायी पहावे, अशी त्यांची दृष्टी आहे. आई म्हणजे साक्षात देवाचे स्वरूप असतात, तेच खऱ्या अर्थाने पूर्णपणे ईश्वर अ अशा रीतीने तुकारामांनी आईवडिलांविषयीच्या कृतज्ञतेला एक अतिश आणि उत्तुंग परिमाण दिले आहे, असे या अभंगातून जाणवते.

BA IInd Sem IIIrd

तरुणपणात विकारांच्या आहारी जाणारा मनुष्य आणि क्रमशः स्वतःवर विजय मिळवून परिपक्व झालेला मनुष्य यांच्यामध्ये असलेले अंतर स्पष्ट करण्यासाठी तुकारामांनी लोण्याचे उदाहरण दिले आहे. दैनंदिन जीवनातील अत्यंत सामान्य घटनेच्या सूक्ष्म निरीक्षणातून तुकाराम कवित्वाची कोवळी पालवी कशी निर्माण करीत असत, याचा हा उत्तम पुरावा होय. लोणी कढविण्यासाठी त्याला उष्णता दिली, की जोपर्यंत त्याचा 'लोणीपणा' संपत नाही, तोपर्यंत ते कडकडते. या रूपाने ते जणू काही आपली उच्छृंखलता प्रकट करते. पण एकदा का त्याचे तुपात रूपांतर झाले, की मग ते निश्चळ होऊन राहते, जणू काही शांत, निर्विकार बनते. त्याचा कच्चेपणा लोप पावतो. जो दगड टाकीचे घाव सोसूनही टिकून राहतो, त्याला देव मानून लोक त्याच्या पाया पडतात.

११ ओले मूळ भेदी खडकाचे अंग । आभ्यासासी सांग कार्यसिद्धि ।।१ ।।
नव्हे ऐसे काही नाही अवघड । नाही कईवाड तोंच वरि ।।२ ।।
दोरें चिरा कापे पडिला कांचणी । अभ्यासें सेवनीं विष पडे ।।३ ।।
तुका म्हणे कैचा बैसण्यासी ठाव । जठरीं बाळा वाव एकाएकी ? ।।४ ।

(अ.क्र.१४००

ओले मूळ खडकाचे अंग भेदू शकते. अभ्यासामुळे, म्हणजेच सततच्या सरावामुळे माणसाला सर्व अंगांनी परिपूर्ण अशी कार्यसिद्धी प्राप्त होते. होऊ शकत नाही, इतके अवघड जगात काही नाही. जोपर्यंत आपण एखादे कार्य करण्याचा निश्चय (कईवाड) करीत नाही, तोपर्यंतच ते अवघड वाटते. दोरा जर एखाद्या दगडावर विशिष्ट पद्धतीने घासला, तर त्या घर्षणाने त्या दगडाला कच पडतो आणि तो दगडही कापला जातो. अभ्यासामुळे विषही पचनी पडू शकते. गर्भस्थ लहान मूल आईच्या उदरात स्वतःसाठी प्रयत्नपूर्वक जागा निर्माण करते. या सर्व उदाहरणांत तुकारामांनी प्रयत्नाचे व अभ्यासाचे महत्त्व जोरदारपणे मांडले आहे.

मुळाच्या बाबतीतील त्यांचे वरील विधान हे तर त्यांच्या निरीक्षणशक्तीचे मार्मिक द्योतक म्हटले पाहिजे. पिकाला वा झाडाला योग्य वेळी पाणी मिळाले की त्याचे एक-एक ओले मूळ एका नव्या जीवनशक्तीने भारावले जाते. जगण्याच्या आकांक्षेने उत्तेजित होते. आपल्या विकासाच्या धडपडीत ते जमिनीत अधिकाधिक खोल घुसण्याचा प्रयत्न करते. अशा वेळी कठीण असा खडक आडवा आला, तर तो त्या मुळाला रोखू शकत नाही, थांबवू शकत नाही. मोठ्या नेटाने ते त

BA IInd Sem IIIrd

आहेत, असे म्हणतात. तुकारामांवर अपार प्रेम करणाऱ्या लोकांनी त्यां
वृत्तीचा अंगीकार केला पाहिजे, असे मला वाटते. माणसामध्ये आरपा
करून टाकण्याचे सामर्थ्य त्यांच्या या विचारात आहे. याच अभंगात त्य
काढलेले उद्‌गार कसे आत्मविश्वासाने ओतप्रोत भरलेले आहेत, ते पाहण्
आहे. हातात घेतलेल्या दिव्यामुळे रात्र दुरावली आहे आणि ती कशी
दिसतही नाही इतकी दुरावली आहे, असे ते म्हणतात. हा दिवा विचारांच
विवेकाचा आहे. ज्ञानाचा आहे. मानसिक सामर्थ्याचा आहे. अज्ञानाची
दुबळेपणाची रात्र कुठल्या कुठे पळून गेली आहे. तुकाराम हे सगळे
स्वत:चा एक आत्मनिष्ठ अनुभव म्हणून सांगत आहेत, असे नाही. आपल्य
भावंडांनी हा विचार पचवावा, हे सामर्थ्य प्राप्त करावे, अशीच त्यांची
आहे. असे सामर्थ्य प्राप्त झाले, की अशुभाचेही शुभात रूपांतर होते, हे
ते आणखी म्हणतात, ''सुख हे दु:खाच्या विरोधी, त्यापासून वेगळे राहणा
आघात देखील हितकारक फळे देतील.'' याचा अर्थ संकटे नुसती दूर हो
नष्ट होतील, असे नाही, तर त्या संकटांचेच हितकारक, कल्याणकारक
रूपांतर होईल. स्वत:चे आंतरिक विश्व बदलले, की बाहेरचे अवघे
बदलेल. मग कुणी अशुभ, अपवित्र आहे, ही भावना राहणार नाही, सगळे
भले वाटू लागतील. चांगले वाटू लागतील. या अभंगाच्या अखेरीस
म्हणतात, सर्व जीवजंतू हे आता आमच्या दृष्टीने भले झाले आहेत. मनाची
प्रसन्नतेने फुललेली ही अवस्था आपल्याला लाभावी, असे कुणालाही
इतके मोठे वैभव या उद्‌गारात आहे.

शेती

२० शुद्धबीजा पोटीं । फळे रसाळ गोमटी ।।१।।
मुखीं अमृताची वाणी । देह वेचावा कारणीं ।।२।।
सर्वांगीं निर्मळ । चित्त जैसे गंगाजळ ।।३।।
तुका म्हणे जाती । ताप दर्शनें विश्रांती ।।४।। (अ.क्र.६२

मूर्तिमंत निरागसतेचे दर्शन घडविणारा हा नितान्त रमणीय अभंग वाच
व श्रोत्यांच्या हृदयावर अधिराज्य गाजविल्याशिवाय रहात नाही. शेतकऱ्
शेतामध्ये शुद्ध, निर्दोष, न किडलेले, टपोरे, कसदार, उत्तम गुणधर्मांनी यु
बी पेरले, या चांगल्या

BA IInd Sem IIIrd

प्रस्तुत ठिकाणी पहिल्या दोन गोष्टींचे विवेचन विवक्षित नाही. परंतु मानवाच्
वाणीचा जो विकास झाला आहे, तो मुद्दा मात्र येथे फार महत्त्वाचा आ
माणसाची वाणी, भाषा जर विकसित झाली नसती, तर त्याच्या मेंदूचा आ
हातांचा प्रचंड विकास होऊन देखील त्याला आजच्याइतकी प्रचंड प्रगती कर
आली नसती. मानवाने वेळोवेळी शोधून काढलेली सृष्टीची असंख्य रहस्ये ए
व्यक्तीकडून दुसऱ्या व्यक्तीकडे पोचणे आणि विशेषत: एका पिढीकडून दुस
पिढीकडे पोचणे भाषेच्या अभावी इतक्या समर्थपणे घडू शकले नसते. भाषे
अभावी प्रत्येक पिढीला जवळजवळ नव्याने सुरुवात करावी लागली असत
आणि म्हणूनच माणसाने आज पृथ्वीतलावर जे एक सांस्कृतिक अधिराज्य
केले आहे, त्याचे एक प्रमुख अधिष्ठान म्हणजे भाषा होय.

वाणी अधिक विकसित असल्यामुळे माणूस इतर प्राण्यांपेक्षा श्रेष्ठ ठरत
त्याच्यावर वर्चस्व गाजवू शकला. नेमकी हीच स्थिती माणसा-माणसांमध
संबंधामध्ये देखील आढळून येते. ज्या माणसांची वाणी अधिक विकसित अस
ती माणसे यशस्वी होतात, कर्तृत्ववान ठरतात. याउलट, ज्यांची वाणी अविकसि
सामर्थ्यहीन असते, त्यांची पीछेहाट होते.


निसर्ग

३७ वृक्ष वल्ली आम्हा सोयरी वनचरे। पक्षी ही सुस्वरें आळविती ।।१।।
येणें सुखें रुचे एकांताचा वास। नाही गुण दोष अंगा येत ।।२।।
आकाश मंडप पृथिवी आसन । रमे तेथे मन क्रीडा करी ।।३।।
कंथाकुमंडलु देहउपचारा । जाणवितो वारा अवसरु ।।४।।
हरिकथा भोजन परवडी बिस्तार । करोनि प्रकार सेवू रुची ।।५।।
तुका म्हणे होय मनासी संवाद। आपुला चि वाद आपणांसी ।।६।।

(अ.क्र.२४

हा अभंग एका बाजूने तुकारामांनी आपल्या स्नेहबंधाच्या, आत्मीयतेच
नात्याच्या, सोयरेपणाच्या कक्षा किती आणि कशा विस्तारलेल्या होत्या
दर्शविणारा आहे. तो दुसऱ्या बाजूने तुकाराम स्वत:च्या मनाचा तळ गाठण्यास
अगदी अंतर्मनाच्या आत खोलवर बुडी मारण्याचा प्रयत्न कसा करीत
आपल्या अस्तित्वाच्या गाभ्याला स्पर्श करू पहात होते, आपले अंतर्विश्व अस

BA IInd Sem IVth (MLT)



Co-ordinator,

आठवणींचे प

BA IInd Sem IV th

अनुक्रमणिका

गोष्ट पाटी-पुस्तकाची
असे ते दिवस
बिन हिश्श्याचा हक्क
तूबी माणूस हैस
बाभळीची साल
हडकं
असं हे घडलं मला घडविण्यासाठी
गिरणीचं पीठ
कणसाचं धाट
बिदवा
परक्षा
जातील हेबी दिवस
दोन प्राणी, उंट आणि मी
कुपाटी
शिकार
चेलमा
आठवणींचे पक्षी
आजूनही आठवतात आकडे २५, २६ मिळून ५१
बोळाई
हुरडा
आठवण छावणीची
उंटावरचा प्रवास
कथा आणि व्यथा
पैशाला एक दगड
ड्रील ते सायकॉलॉजी
देवा तुझा आशीर्वाद
गावचा गोडवा

BA II Yr Sem IV th

गिरणीचं पीठ

हडोळतीला शाळा शिकायला असताना शाळा झाल्यावर किंवा मधूनच कोणी कुठंही बोलावले की कोणाच्याही घरी जातासे. तशातलाच एक प्रकार. जसं कुण्याही गावाच्या जरासं बाहेरच्या बाजूलाच मांगमहारोडा असतोय तसाच व्हता महारोडा जरा गावाच्या वाटेच्या पल्याड. दर मंगळवारी आठवडी बाजार भरतोय तिकडं. खाल्लाकडं मांगोडा व वरलाकडं महारोडा चेऱ्याकून जातान मांगोडाच लागायचा तर महारोडानंतर व शाळंकून फिरताना महारोडा. पयल व मांगोडा नंतर.

असं व्हता व्हता माझ्या वर्गातल्या एका माळकरी पोराची गाठ पडली तो महाराचाच, त्याचं नाव व्हतं धर्मा. त्याची मायबी माळकरीनच. खरं म्हंजे त्याची माय काळकरीन म्हणून तोही माळकरी म्हंजे जरा नामस्मरण हरिनाम जपणारा व मांस मच्छर न खाणारा व जरा सोचे रहाणारा इतर महारामांगांच्या पोरांपेक्षा. तो पाचवीत असून जरा लाडाकौतिकाचा एकुलताएक म्हणून त्याची माय त्याला चांगलं ठेवत व्हती.

धर्मा जरा काळासावळाच व देवीचे खूप अंगावर वण असलेला पण जरा सोचे राहातासल्यामुळं जरा बरं दिसायचा व तवा खरं म्हणजे महारमांगाच कोणीबी अंगाकपड्याला साबण लावत नसे पण तो लावीतासे म्हणून जरा त्याचा घमघमाट वास येतासे. तो पांढरंखळीक धोतर व पांढरा खळीक नसत कधीमधी जमेल तसा नेहरू शर्ट घालीतासे व तवा महारामांगाच्या पोराईत जरा उठून दिसतासे तरीही वरचे पोरं शेवटी खालचाच म्हणायचे. तो तस कुणाच्या अद्यातमद्यात पडत नसे. आपलं सोचे रहाणं भलं की आपलं मजेशी खाऊन पिऊन लेव्हणं पुसणं भलं.

धर्माची मायही वारकरी पंथाची माळकरीनबाई. भजनापूजनाची लई आव असलेली. तिला एक मुलगा झाल्यावर ती विधवा रांडव झालेली. बिचारी ती पांडुरंगाचं नाव घेत आपल्या तानुल्याला सांभाळत रंडकंपण घालवतासलेल व धर्मा शिकून सवरून मोठा झाल्यावर आपला पांग फेडील या आशेनं ति त्याला हडोळतीच्या एका कणीही नसलेल्या म्हातारीकडे सगळं काही पुरवि

BA IInd Sem IVth

बिदवा

गोष्ट सांगायची म्हंजे अशी की मी हमेशा शाळा नसली किंवा संपली की कुठंना कुठं कामावर जात असे. अन् कामावर जाण्याचा हेतू हाच असायचा की मज्या बहिणीवर जो मजा बोजा पडतोय तो थोडाफार कमी पडावा किंवा तिला निदान वाटावं की माझा भाऊ लगेच आयतं खायला बसत नाही, काही तरी त्याच्या न्हनग्या जिवापरमानं करतोय. मी जरा आक्काला भिऊनच राहायचो कारण आक्का लई प्रेमळ पण कधी कधी लईच खविस व वंगळ पण बोलायची व जे शिव्या किंवा जे शब्द आजच्या नवीन डिक्शनरीत सापडणार नाहीत ते खास ठेवणीचे सनाटून माझ्यासाठी वापरायची व ते ऐकून मला खूप अवघड वाटायचं व कशाला ईच्या इतं पडलोय गड्या बिनदिकीच उगीचंच वाटायचं पण नाईलाज व दुसरीकडं सतनागत म्हणून मी तिथंच चिटकून राहावयाचो व पुन्हा कधी तिने असे खास ठेवणीचे शब्द वापरू नये म्हणून खूप मन लावून कुठंना कुठं कामावर जाऊन काम करायचो व दिलेला थोडा लई मुशारा आणायचो. मुशारा आणल्यानंतर कधी आपल्याला चांगलं म्हणावं म्हणून आक्काला दाखवलं की, ती म्हणायची की अरं खायला लागत नाही कारं दुदम्या. केलाच तर मला काय अशान है. पोटासाठी कुणालाबी काम करावंच लागतंय. ती सबावानं जरा आरकटच है. अर्थात प्रेमळ पण तशीच. तिचे बोलणं ऐकून मला वाईट वाटायचं कारण मला कळायचं नाही परंतु मी जसजसा मोठा होऊ लागलो तसं तसं मला कळायला लागलं की तिच्यावर दाजी व आत्याचा धाक है म्हणून व म्हणून ती मला बोलतीया नसता कशाला बोलली असती बिचारी, कारण ती व मी एकाच कुसातले शेवटी. परंतु कुसातून बाहेर पडल्यावर या साऱ्या गोष्टी आणि त्या येणारच, कारण आपण सारे माणसं दोन धाटासारख्या पायावर उभ राहिलेल्या कणसासारखे.

असा हा प्रकार माझा नि माझ्या बहिणीचा व तिच्या घरच्यांचा, असं हे चालतानासुद्धा मी शाळा कधी बुडविल्याचं मला आठवत नाही. मग कधी शाळेत जाऊ नको म्हणून बहीण रागावली असेल किंवा कधी खूप रागावून रोटीबी दिली नसेल. कधी असून, तर कधी नसून तरी मी

BA IInd Sem IVth

कु

मी व्हतो चवतीत चेऱ्याच्या साळेत. तवा व्हते गीरराव
शिकवायला. ते व्हते जरा ठेंगू बांध्याचे. त्यांनी सांगितलं की,
जरा लाकडं घेऊन या बरं. आमी गेलो. मी नि दाजीचा राम. गेलो भाव
शेताजवळ. तितं व्हती कुपाटी. चांगली लावलेली. माजा जीव
पन राम जरा तापडच व्हता. त्यानं उपसलं एक फरळ, त्या कुप
कूप व्हतं पोलीस पाटलाचं. पन व्हतं केलं शेत कोळ्याच्या श
जमादारानं. तितं व्हता त्याचा ल्योक. त्याचं नाव गणेशा. भयंकर
व खराब पोरगा, त्यानं फायलं की आलाच तो कातावून आमच्यावर. अ
सुटलं कापरं. गणेशानं जे आमाला तंग केलं. काई केल्या जाऊ दे
तो मोटा व्हता. आमी व्हतो लहान व सापडलो गुन्ह्यात. आणखी
आमी म्हाराचे पोरं. त्यात मी परदेशी. त्याला जरा पऊर आला. अ
न्हेलं त्यानं एका पडक्या हिरीवर. त्यानं जे त्यातलं वंगळ पानी अ
अंगावर टाकायला सुरू केलं की तोबाहल. तो जाऊच देईना. अ
वाकायला लावलं व पाटीवर थंडगार पानी ओतुलाला. काकडून हु
भरली. कारण हिवाळ्याचे व्हते ते दिवस. मी जे रडू लागलो. आ
गेलं रडू. अण्णा, अण्णा म्हणून ओरडू लागलो. त्यानं सोडलं. आमी
घरी. पन मास्तर काय म्हनील की म्हणून जरा भीवच वाटत व्हतं. मास
सगळं सांगलं. तो बसला बिचारा. काय बी न म्हनता.

झालं काय एकदा. तर मी गेलो व्हतो बिबाडीत. वांजखाऊ
रानात. बिबे आणावं म्हणून. लई मिळाले बिबे. आलो घेऊन कु
खूप लाल हिल्ल्याळ व्हते काई. मला लागली व्हती भूक लई.
चेऱ्याच्या रानात. व्हतं एक वावर शेंगाचं. डोकळ्याचा पुंडलिक प
व्हता त्याचा मालक. वावरात कायबी नव्हतं. दोनदा शेंगा काढून न
व्हत्या व नंतर कुळव धरला व्हताजुन. जरा दोन शेंगा मला दिस
मी वंगळ मन करून त्याला हात लावलो. खाल्लोही नाही तर आली परया
शेताची मालकीन. आली ती चवताळून मज्या अंगावर. कारण शेंगाचं

BA IInd Sem IVth (MCJ)

लोकचरित्रातील निवडक कथा

संपादक
राजेंद्र रंगराव राऊत

Commerce Coll

BA II nd Sem IV th (MLI)

* अनुक्रमणिका *

अ.क्र. लीळा	प्रमाण मराठी अनुवाद	पृष्ठ क्र.
१. ससीकरक्षण	ससा रक्षण	२५
२. उकरडां पहुडु	उकिरडा व्याला	२७
३. द्विजगोरक्षण	अद्‌भूत गोपालक	२९
४. उमाइनमस्कारें आंगुठा लावणे	उमाईसेचे अज्ञान	३३
५. गणपती मठी अवस्थान	स्वामीनिष्ठा	३५
६. ग्रामेस्वरा गर्वानुवाद	गर्विष्ठ गावप्रमुख	३७
७. मार्गी पदुमनाभी भेटि : धांदलमोक्षकथन	धांदुलमोक्ष	३९
८. चक्रवाकु अनुवादु	चक्रवाक पक्षी	४२
९. गोलडी गाय कथन	असंगाशी संग	४३
१०. विष्णुस्वामि घुटिकासीधि	विष्णुस्वामी घुटिकासिद्धी	४५
११. रुम्हणेयाचा दृष्टांत कथन	अर्थाचा अनर्थ	४७
१२. कठीयाचा दृष्टांत	अविधीतून अविधी	४९
१३. साधां मोदक विपलाणें	साधा सुगरण !	५२
१४. श्रावणा भगति कथन	श्रावणाची भक्ती	५४
१५. डांगुरेया देहावसान	स्वामीभक्ती	५७
१६. गोकुळाष्टामी पूजा	गोकुळ अष्टमी	५९
१७. कौरवां सवावो	कौरवा सवावो	६२
१८. गुंफे चोर वीद्रावण	चोर नागवला !	६४
१९. सांडल्याकौंडल्या आख्यायिका कथन	शांडल्या-कौंडल्या	६६
२०. बाईसीं वनदेओ पुसणें	वनदेव	६९

१. ससीकरक्षण

एकी गावीं गोसावीयांसि वस्ति जाली: वीहरणा बीजें केलें : वृक्षा एकाखालि गोसावीयांसि आसन जालें होतें: दोहों पारधीयां होड पडली: 'जेयाचीं सुनीं ससा टाकी तो होड जीके:' दोहों पारधीं ससा सोडिला : रानीं दरादरकुटा नाहीं: ओहळखोहळ नाहीं : ऐसें समस्तळ भूमिका पाहिली: ससा सोडिला: तेयासर्वे सुनीं लागलीं: ससा पळतु जातु होता: तवं गोसावीयांतें देखिलें : आणि गोसावीयांते टाकुनि आला: सर्वज्ञें म्हणीतलें : ''माहात्मे हो: या:'' म्हणौनि गोसावी जानु उचलिली: तो एउनि गोसावीयांचीए जानुखालि रीगाला : श्रीमूर्ति अवळोकुं लागला: तवं मागीलाकडौनि सुनीयां आलीया: तीया पुढां उभीया राहिलीया: तीयामागिलाकडौनि पारधी आले : ते पुढां उभे राहिले : दंडवत केलें: श्रीचरणां लागले : मग तेही गोसावीयांतें वीनवलें :''जी जी : ससा सोडावा:'' सर्वज्ञे म्हणीतलें: ''हा नेदिजे:'' तेहीं म्हणीतलें : ''हा होडेचा ससा: देयावा जी : याकारणे सुरीया काढणीयां होती :'' सर्वज्ञें म्हणीतले: हां गा : एथ सरण आलेयां काइ मरण असे ?'' मग तीहीं श्रीमुखाची वास पाहिली : ''जी जी : तरि हा गोसावी राखिला : '' ऐसें म्हणौनि ते नीगाले : मग नीगतां सर्वज्ञें म्हणीतलें : ''हां गा : एं रानींवनीं असति : तृण खाति : नदीवाहाळाचीं उदकें पीति : यांतें तुम्ही कां गा मारा ? एं तुमचें काइ करीति ?'' ''जी जी तरि आजिलगौनि न मारूं : आणि काइ:'' ऐसें म्हणौनि तेहीं दंडवत केलें: श्रीचरणां लागले : मग निगाले : ते गेले : गोसावीं वरती जानु उचलीली : आणि तेयांतें अवळोकुनि सर्वज्ञें म्हणीतलें: ''माहत्मे हो: आतां जा :'' आणि नीगाला : ॥

ससीकरक्षण

(लीळाचरित्र, शा.प्रत, पूर्वार्ध ४२)

***

श्रीचक्रधर स्वामी सालबर्डीच्या जंगलात बारा वर्षे भ्रमंती करीत होते. या त्यांच्या वास्तव्यात १२ मार्च १२३४ रोज रविवार या दिवशी ते वृक्षाखाली बसले होते त्यावेळी ही घटना घडली. त्यावेळीच श्रीचक्रधरांनी समस्त जीवांना आश्वस्त करणारे 'एथ सरण आलेयां काइ मरण असे ?' हे पहिले वचन उच्चारले.

सुरू होती. शेतकरी इंद्राला म्हणाला, ''तुमचे म्हैसरू चोर आहे. माझे संपूर्ण शेत याने खाल्ले आहे.'' इंद्र म्हणाला, ''तुझे किती शेत खाल्ले आहे त्याची भरपाई आम्ही देऊ. तू ओरडू नकोस. तू आपली घोंगडी पसरव.'' त्याने आपली घोंगडी पसरवली. इंद्राने त्यात सोने घातले. शेतकऱ्याने त्याचे गाठोडे बांधले. मग तो म्हणाला, ''आता मी परत जाऊ कसा ?'' इंद्र म्हणाला, ''आलास कसा ?'' तो म्हणाला, ''मी तुमच्या म्हैसरुचे शेपूट धरून आलो.'' इंद्र म्हणाला, ''या म्हैसरूच्या पाठीवर तुझे गाठोडे ठेव, तू याचे शेपूट धर आणि जा. पण तुझ्या शेतात आमच्या म्हैसरुला चरू देत जा.'' '' हो. कां नाही ?'' असे म्हणून तो शेतकरी ते द्रव्य घेऊन आला. मग त्याच्या घरी भरपूर संपत्ती झाली. तो तूप - भाताचे जेवण करू लागला. तांबूल घेऊ लागला. अशा प्रकारे चैनीत जगू लागला. त्यावेळी त्याचे शेजारी म्हणू लागले की, हा धांदुल दादा सुखी समाधानी दिसतो. त्यातील एका म्हातारीने विचारले, ''धांदुलदादा, तू श्रीमंतासारखा दिसतोस. तुला खायला - प्यायलाही भरपूर दिसत आहे. तू तर शेताकडेही जात नाहीस. मग हे सर्व कसे ? हे सर्व कशामुळे ?'' तेव्हा धांदुल म्हणाला, ''अहो, तुम्हाला काय सांगू ?'' मग लोकांना त्याने सर्व गोष्ट सांगितली. मग ते सर्व म्हणाले, ''हो कां ? आम्हाला तेथे घेऊन जाशील का ?'' धांदुल त्याकरिता तयार झाला. मग सायंकाळच्या वेळी धांदुलने त्यांना शेतावर बोलावले व त्यांना सोबत नेईन असे म्हणाला. सायंकाळी सर्वजण शेतात गेले. त्यावेळी तेथे हत्ती आला. धांदुलाने त्या हत्तीची शेपटी धरली. दुसऱ्याने धांदुलाची कंबर धरली. तिसऱ्याने दुसऱ्याची कंबर धरली. अशी एक प्रकारची माळच तयार झाली. इतक्यात धांदुलाने हत्तीच्या पाठीवर काठी हाणली, तसा तो हत्ती उंच उडाला व थेट आकाशमार्गे जाऊ लागला. आकाशमार्गे जाताना म्हातारीने एक प्रश्न विचारला, ''धांदुलदादा, तेथे दामाचा कापूस किती ?'' धांदुलदादाने 'एवढा' म्हणून दोन्ही हात पसरविले. त्यासरशी हत्तीचे शेपूट सुटले आणि सर्वजण खाली पडले.

स्वर्गात काय त्याने कापूस पाहिला होता ? पण तो खोटं बोलला आणि सर्वजण खाली पडले. म्हणून खोटे बोलू नये.

***

पात्रे- श्रावण, श्रावणाचे मातापिता, दशरथ
निवेदक- श्री चक्रधर स्वामी
श्रोते- भक्तगण

श्रावणाची भक्ती

त्रेता युगात मातापित्यांची भक्ती हा धर्म होता. श्रावणाने सुद्धा आपल्या मातापित्यांची भक्ती खूपच चांगली केली. एके दिवशी श्रावणाचे मातापिता श्रावणाला म्हणाले, "बा श्रावणा, आम्हाला वाराणशीला नेशील का?" त्यावर श्रावण आपल्या जन्मदात्यांना वाराणशीला घेऊन निघाला. प्रवासादरम्यान एका गावाजवळ त्यांपैकी एक जण म्हणाला, "श्रावणा, तहान लागली रे बाळा." श्रावणबाळाने एका दाट वृक्षाच्या सावलीत खांद्यावरील कावड खाली ठेवली व तो पाणी आणण्यासाठी कमंडलू घेऊन नदीच्या दिशेने निघाला. श्रावणाने आपल्या कमंडलूमध्ये पाणी भरण्यासाठी ते पाण्याच्या पात्रात बुडवले. त्यावेळी कमंडलूमधून "भुड-भुड-भुड-भुड' असा त्या पाण्याचा आवाज होऊ लागला.

नेमका त्याचवेळी निपुत्रिक म्हणून दुःखी असलेला दशरथ राजा नदीच्या तीरावर झाडीत शिकार करण्याकरिता लपून बसला होता. 'भुड-भुड' आवाज ऐकताच दशरथ सावध झाला. "सावज आले असे समजून त्याने त्या आवाजाच्या दिशेनं शब्दवेधी बाण मारला. तो बाण सर्रऽऽऽ आवाज करीत क्षणार्धात श्रावणबाळाला लागला. प्रचंड आरोळी ठोकत जखमी श्रावण खाली कोसळला. माणसाच्या किंकाळीचा आवाज ऐकताच दशरथ धावतच त्या दिशेने गेला. तेव्हा श्रावण जखमेने विव्हळत म्हणाला-"मी श्रावण आहे. माझे जन्मदाते मातापिता तहानलेले आहेत म्हणून मी पाण्याकरित आलो होतो. आता तुम्ही त्यांच्याकरिता पाणी घेऊन जा. त्यांच्याशी एकही शब्द न बोलता त्यांना पाणी पाजा. ते काही बोलले तरी तुम्ही फक्त 'हुं' असेच म्हणा."

BA II Sem IV (MLT)

२५. म्हाइंभटां उदग्रहणीकापुर्वक इश्वर प्रतीति

''गावां हस्ति आला: ते जात्यंध हस्ति पाहों गेले: एकें देखीला: एकें सोंड देखीली: एकें कानु देखीला: एकें पाठि देखीलें पोट देखीलें: एकें पुंस देखीलें: मग ते एकमेकां संवादति: 'हां हस्ति देखीला?' पावो देखीला तो म्हणे: 'हस्ति खांबासारिखा: देखीली तो म्हणे: 'हस्ति मुसळासारिखा:' कानु देखीला तो म्हणे: सुपासारिखा:' पाठि देखिली तो म्हणे: 'हस्ति भिंतीसारिखा: पोट तो म्हणें: हस्ति कोथळेयासारिखा: पुंस देखिलें तो म्हणे खराटेयासारिखा:' ऐसें एकमेकां उरोधीति: तेयामध्यें डोळसु हो म्हणे: 'आगा ए: हा हस्तिचा एकुएकु अवयेउ होए: परि हस्ति नव अवयेवीं युक्त तो हस्ति:' तैसें जयासि जे शक्ति प्रकासली असे शक्तितें परमेश्वरू म्हणे: ज्ञानिया असे तो म्हणे: 'हे परमेश्वराची ए शक्ति असे: परि परमेश्वरू नव्हे: ऐसा शक्तियुक्त तो परमेश्वरू:''

म्हाइंभटां उदग्रहणीकापुर्वक इश्वर प्र

(लीळाचरित्र, शा.प्रत, उत्तरार्ध १३३)


***

एके दिवशी म्हाइंभट श्रीचक्रधर स्वामींची कीर्ती ऐकून भेटीला आले. त्यांचे मामा गणपती आपयो देखील सोबत आले. अत्यंत विद्वान व सर्व विद्या संपन्न आहेत अशी त्यांची ख्याती होती. श्र स्वामी हे सुद्धा अत्यंत ओजस्वी पुरूष आहेत, ते अनिवार मराठी बो त्यामुळे त्यांना पराभूत करावे अशी म्हाइंभटांची मनीषा होती. ते स्वा मराठीत शास्त्रचर्चा करू लागले. पण पराजय दृष्टिपथात येताच सं चर्चा सुरू केली. श्रीचक्रधर स्वामींनी अस्खलित संस्कृत बोलून त्यांन केले. या चर्चेदरम्यानच म्हाइंभटाच्या एका प्रश्नाला उत्तर देताना श्र स्वामींनी जीवास बोध व बोध प्राप्त होण्याचा मार्ग सांगितला व त्या हत्तीचा दृष्टांत सांगितला.

***

एक होता कार्व्हर

वीणा गवाणकर



वि. ए. आय ई, सेमे-VI
विषय - मराठी (ऐच्छिक)

अनुक्रम

(१) मेरीचं पोर / ११

(२) ज्ञानासाठी दाही दिशा...! / २५

(३) प्रारंभाचा शेवट / ४५

(४) स्वातंत्र्यग्रस्त / ६७

(५) विपन्न ॲलाबॅमा / ७१

(६) 'मी येत आहे!' / ८०

(७) कर्मभूमीत / ८४

(८) गंगा आली रे अंगणी / १०१

(९) केमर्जिस्ट / ११३

(१०) "पोरा, तू आम्हांला धन्य केलंस!" / १२३

(११) मी न माझा / १२४

(१२) विज्ञान तुम्हांला स्वतंत्र बनवील! / १३७

(१३) मी भूमिपुत्र! / १४६

(१४) दुरिताचे तिमिर जावो... / १५६

(१५) सुखिया जाला / १६५

(१६) महानिर्वाण / १७९

कार्व्हर यांच्या समाधीवरील शिलालेख / १८१

जॉर्ज वॉशिंग्टन कार्व्हर : जीवनप्रवास / १८२

संदर्भग्रंथ / १८४

⑨ मेरीचं पोर

"ए! चल, उठतोस की येऊ मीच तिकडे?"

मोझेसबाबांची दमबाज हाक ऐकून ते काळं, बारकं पोर दचकून उठलं. अजून उजाडलंही नव्हतं. पण मोझेसबाबाला कुठला तेवढा धीर?


"तुझ्याएवढी पोरं बघ कशी धारा काढतात, गुरं राखतात, कोंबड्या-डुकरांची देख करतात. पण तुझे हे असले काड्यामुड्यांचे हातपाय आणि हे असलं मुकं तोंड... काय तुझं ते देवास ठाऊक!"

"नका हो असं करवादू!" सूझनबाई आपल्या नवऱ्याला—मोझेसला—चुचकारत म्ह "केवढंसं पोर ते. काल दिवसभर काम करून थकलंय."

"पण मला शेतात कोण मदत करील? खिशात ना पैसा ना अडका. लागवडही झालेली नाही. अशा आळसाने उभ्या पिकाची नासाडी व्हायची." मोझेसबाबा कुरकुर

"काही काळजी करू नका. ईश्वरकृपेने सारं ठीक होईल. अहो! हा दुबळा पोरसुद्धा काही दिवसांनी कसा ठणठणीत होईल तो!"


"हो! होईल! एक घोडा होता तोही या पोरापायी गमावला..."



मेरीला मोझेस कार्व्हरने विकत घेतल्याची पावती

की हे पोर जगेल! फक्त सूझनबाई मात्र जिवापाड काळजी घेऊन मेरीचं पोर जगवत हो
त्यांच्या दीर्घ परिश्रमांना यश आलं. त्या पोराने जीव धरला. तो हळूहळू चालू लागला, र
लागला. पण वारंवार उसळणाऱ्या भयानक खोकल्याच्या उबळीने त्याचं स्वरयंत्र साफ बिघ
होतं. त्याला बोलता येत नव्हतं. मेरीचं पुढे काय झालं हे कधीच कोणाला कळलं नाही.
उत्तम, उमदा घोडयाच्या बदल्यात परत मिळवलेला मेरीचा दमेकरी, दुबळा, मुका पोर
कार्व्हरच्या घरात वाढत होता. त्याच प्रसंगाची मोझेसबाबांना आठवण झाली. सूझनबाईंच्या
शुश्रूषेत, देखभालीत त्यांचाही वाटा होता. मेरीला त्यांनी गुलाम म्हणून कधीच वागवलं न
मेरीच्या या पोराबद्दल त्यांना ममता होती. ही ममता सूझनबाई जाणून होत्या.

अमेरिकेतील राज्याराज्यांतील यादवी संपली होती. गुलामगिरी कायद्याने नष्ट कर
आली. यादवीपायी विस्कळीत झालेलं जीवन पुन्हा सुरळीतपणे सुरू झालं होतं. शेती
करायला उसंत मिळू लागली होती. युद्धाचा रखरखाट संपून सगळीकडे जीवन बहरत
डायमंड ग्रोव्ह आणि आजूबाजूच्या 'ओझार्क' टेकड्या फळाफुलांनी बहरू लागल्या ह
बहरलेल्या निसर्गात कार्व्हरचा तो अनाथ पोर सुखावत होता. आता तो दहा-एक वर्षांचा
होता. मोझेसबाबांनी गुरांची, बागेची, परसूची देखभाल करण्याचं काम त्याच्यावर सो



Coordinator
IQAC
College Seal